# देगलूर महाविद्यालयाच्या खेळाडूंची विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स संघात निवड

**देगलूर, ता.२७ (बातमीदार) :** देगलूर महाविद्यालयातील एम.ए.द्वितीय वर्षाचा विद्यार्थी बालाजी हिरेवाड व बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी शिवरानी गुडूप या खेळाडूंची नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स संघात निवड झाली आहे. येत्या (ता.२६) ते (ता.२९) डिसेंबर या कालावधीत ओडिसा राज्यातील भुवनेश्वर येथील कलिंग इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल टेक्नॉलॉजी येथे आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी या खेळाडूंचा विद्यापीठ संघात निवड झाली आहे. या खेळाडूंचे प्रशिक्षक प्रा. डॉ. निरज उपलंचवार हे काम पाहत असून त्यांना प्रा. दिपक वावधाने व प्रा. हाके सिताराम यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड झाल्याबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, नारायणराव



**शिवरानी गुडूप, बालाजी हिरेवाड**

मैलागीरे, सुर्यकांत नारलावार, विलास तोटावार व राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, जनार्दन चिद्रावार, गंगाधर जोशी, रवींद्र घाडे, देवेंन्द्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, डॉ. मोहन खताळ, डॉ. अनिल चिद्रावार, प्रा. ऊतमकुमार कांबळे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, गोविंद जोशी आदींनी आभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner